लोकमत



दोन्ही खुब्यांच्या सांध्यांचे एकाच वेळी प्रत्यारोपण झालेल्या रुग्णासह एमजीएम रुग्णालयाचे डॉक्टर.

Hello Aurangabad
Page No. 3 Oct 14, 2020
Powered by: erelego.com

लोकमत

# शस्त्रक्रियेच्या दुसऱ्या दिवशी शेतकरी युवक पायावर उभा

लोकमत न्यूज नेटवर्क

**औरंगाबाद :** दोन्ही खुब्यांच्या (हिप) सांध्यांच्या एकाच वेळी प्रत्यारोपणाची क्लिष्ट शस्त्रक्रिया एमजीएम रुग्णालयात नुकतीच पार पडली. शस्त्रक्रियेच्या दुसऱ्याच दिवशी २८ वर्षीय शेतकरी युवक पायावर उभा राहिला, अशी माहिती डॉ. गिरीश गाडेकर यांनी मंगळवारी पत्रकार परिषदेत दिली.

खुब्याच्या दोन्हीही सांध्यांचे यशस्वी प्रत्यारोपण करण्याची ही मराठवाड्यातील पहिलीच वेळ आहे. डॉ. गिरीश गाडेकर, डॉ. गजानन काथार, डॉ. अभिषेक कुलकर्णी, डॉ. कैवाण रंदेरिया आणि डॉ. मोनिका वर्मा यांच्या चमूने ही शस्त्रक्रिया केली. भूलतज्ज्ञ विभागातील डॉ. वासंती केळकर, उमा राईकर आणि शंकर भारती यांनी सहकार्य केले.

डॉ. गिरीश गाडेकर म्हणाले, जालना जिल्ह्यातील दत्ता सावंत या रुग्णाला संधिवात आणि खुब्यासंबंधित प्रचंड त्रास होता. मागील दोन वर्षांपासून त्याला नीट उभे राहता येत नव्हते किंवा चालताही येत नव्हते. शस्त्रक्रियेनंतर त्याला कोणत्याही आधाराशिवाय सामान्यपणे चालता फिरता येत आहे. रुग्णाला मंगळवारी सुटी देण्यात आली.

### दोनदा शस्त्रक्रिया करणे टळले

सामान्यपणे एका सांध्याची आधी आणि ३ ते ६ महिन्यांच्या कालावधीनंतर दुसऱ्या सांध्याची शस्त्रक्रिया करता येते. मात्र, दत्ता सावंत यांच्याबाबतीत अशा प्रकारे दोनदा शस्त्रक्रिया करणे सोईचे नव्हते. कारण, एका सांध्याचे प्रत्यारोपण होऊनही त्याला उभे राहता आले नसते. त्यामुळे एमजीएमच्या डॉक्टरांनी दोन्ही सांध्यांचे एकाच वेळी प्रत्यारोपण करण्याचा निर्णय घेतला आणि त्यात ते यशस्वीही ठरले.

Hello Aurangabad
Page No. 3 Oct 14, 2020
Powered by: erelego.com

Lokmat Times

# BILATERAL TOTAL HIP REPLACEMENT PERFORMED IN ONE GO IN MGM

## This was the first such surgery in Marathwada

**LOKMAT NEWS NETWORK**
**AURANGABAD, OCT 13**

A team of Orthopaedic Surgeons from MGM Hospital successfully carried out a bilateral total hip replacement in one go. This was the first such surgery in Marathwada region.

Addressing a press conference here on Tuesday, Dr Girish Gadekar said that a 28-year-old man Datta Sawant was suffering from arthritis and severe deformities of both hip joints for the past two years. He said that Datta Sawant had difficulty in standing and walking and was unable to do his day-to-day work.

"Generally, in such cases a two phase surgery is performed in which one side surgery is done first and the second one is carried out after a gap of three to six months. This was the first time that one stage surgery of both sides was performed in the region. The patient was able to stand and walk on the next day of surgery. After his discharge, he can walk without the support of a walker," he said.

Dr Gadekar said that bilateral hip surgery is challenging, but it saves money of patients and helps them for the fast recovery. The other team members who performed the surgery are Dr Gajanan Kathar, Dr Abhishek Kulkarni, Dr Kaiwan Randeria and Dr Monica Verma.

Aurangabad First
Page No. 2 Oct 14, 2020
Powered by: erelego.com